RNI No. MAHBIL /2009/35527

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-क

वर्ष ११, अंक ३५] बुधवार, ऑक्टोबर १५, २०२५/आश्विन २३, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ५४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

### अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२५.

क्रमांक साविव्य-२०२५/प्र.क्र.११७/नापु-२८.— भारत सरकार, ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालय, अन्न आणि सार्वजनिक वितरण विभाग, नवी दिल्ली यांचेकडून असाधारण राजपत्र, भाग II-खंड- ३ उप-खंड (i) मध्ये दि. २२ जुलै २०२५ रोजी प्रकाशित झालेली अधिसूचना खालीलप्रमाणे पुनःप्रकाशित करण्यात येत आहे.

**ग्राहक व्यवहार, अन्न व सार्वजनिक वितरण मंत्रालय**

(अन्न व सार्वजनिक वितरण विभाग)

**आदेश**

नवी दिल्ली, २२ जुलै २०२५

सा.का.नि.४८८(ई).— अत्यावश्यक वस्तु अधिनियम, १९५५ (१९५५ चा १०) याच्या कलम ३ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, केंद्र सरकार, याद्वारे, लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणाली (नियंत्रण) आदेश, २०१५ यामध्ये, आणखी सुधारणा करण्यासाठी पुढीलप्रमाणे आदेश काढीत आहेः-

**१.** संक्षिप्त नाव व प्रारंभ.- (१) या आदेशास, लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणाली (नियंत्रण) सुधारणा आदेश, २०२५, असे म्हणावे.

(२) तो, **शासकीय राजपत्रात** प्रकाशित झाल्याच्या दिनांकापासून अमंलात येईल.

**२.** लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणाली (नियंत्रण) आदेश, २०१५ (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त आदेश असा केला आहे) यामधील, खंड ३ मधील उप-खंड (१३) ऐवजी, पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल :-

"(१३) राज्य शासन, अपात्र कुटुंबाना वगळण्याच्या किंवा पात्र कुटुंबांचा समावेश करण्याच्या प्रयोजनार्थ, पात्र कुटुंबांच्या यादीचे नियमितपणे पुनर्विलोकन करील, आणि दर पाच वर्षांनी ई-केवायसी अनिवार्य करील.

(१३क) अठरा वर्षे वय पूर्ण होण्यापूर्वी कोणताही सदस्य, स्वतंत्र शिधापत्रिका धारण करण्यास पात्र ठरणार नाही.

(१३ख) पाच वर्षांच्या आतील मुलांचे, आधार क्रमांक उपलब्ध असल्यास, घेण्यात येतील आणि त्यांचे वय पाच वर्षे पूर्ण झाल्यावर एका वर्षाच्या आत त्या, मुलांसाठी ई-केवायसी लागू करण्यात येईल.".

**३.** उक्त आदेशात, खंड ४ मध्ये, उप-खंड (२१) नंतर, अनुक्रमे, पुढील उप-खंड समाविष्ट करण्यात येतील :-

"(२२) राज्य शासन, ज्यांनी मागच्या सहा महिन्यांपासून आपल्या हक्कांचा लाभ घेतलेला नाही, अशा लाभार्थ्यांच्या शिधापत्रिका तात्पुरत्या स्वरुपात निष्क्रिय करील, त्यानंतर, राज्य शासन, शिधापत्रिकांचे पुनर्विलोकन करण्याकरिता, पात्रता निर्धारित करण्यासाठी, आणि यथोचित कार्यवाही करण्यासाठी पुढील तीन महिन्यांच्या आत क्षेत्रीय पडताळणी करून ई-केवायसी करील.

(२३) राज्य शासन, राज्यातील किंवा राज्याबाहेरील दुसरी प्रत म्हणून निश्चित करण्यात आली आहे अशा लाभार्थ्यांच्या शिधापत्रिका तात्पुरत्या स्वरुपात निष्क्रिय करील आणि अशा निष्क्रिय केलेल्या शिधापत्रिकाधारकांना आवश्यक कागदपत्रे आणि ई-केवायसी सादर करून त्यांची पुनःवैधता करण्यासाठी किंवा पात्रता सिद्ध करण्यासाठी तीन महिन्यांचा कालावधी सुविधा देण्यात येईल.

(२४) राज्य शासन, शिधापत्रिका सुपूर्द करण्यासाठी प्रथम येणाऱ्यास प्राधान्य पद्धत वापरील आणि राज्याच्या वेब-पोर्टल सह, सार्वत्रिकरित्या एक पारदर्शक प्रतिक्षा यादी प्रदर्शित करील व वापरकर्त्यांना त्यांच्या अर्जाची वस्तुस्थिती पाहण्याची मुभा देईल :

परंतु, राज्य शासन, विशेष परिस्थितीत नोंदविलेल्या कारणांसह समाजातील पात्र, असुरक्षित व गरजू समाज घटकांना प्राधान्य देऊ शकेल.".

[एफ.क्रमांक २-१/२०२३-पीडी-दोन]

**रवी शंकर,**
सहसचिव.

## MINISTRY OF CONSUMER AFFAIRS, FOOD AND PUBLIC DISTRIBUTION

### (Department of Food and Public Distribution)

ORDER

New Delhi, the 22nd July, 2025

G.S.R. 488(E).— In exercise of the powers conferred by section 3 of the Essential Commodities Act, 1955 (10 of 1955), the Central Government hereby makes the following Order further to amend the Targeted Public Distribution System (Control) Order, 2015, namely:-

**1.** *Short title and commencement.*- (1) This Order may be called the Targeted Public Distribution System (Control) Amendment Order, 2025.

(2) It shall come into force on the date of its publication in the *Official Gazette.*

**2.** In the Targeted Public Distribution System (Control) Order, 2015 (hereinafter referred to as the said Order), in clause 3, for sub-clause (13), the following sub-clauses shall be substituted, namely:-

"(13) The State Government shall regularly review the list of the eligible households for the purpose of deletion of ineligible households or inclusion of eligible households, and perform mandatory e-KYC every five years.

(13a) No member shall be eligible to hold a separate ration card before the completion of eighteen years of age.

(13b) Aadhaar number shall be captured for children below five years of age, if available and e-KYC shall be performed for children within one year after turning five years.".

**3.** In the said Order, in clause 4, after sub-clause (21), the following sub-clauses shall be inserted, namely:-

"(22) The State Government shall temporarily disable ration cards of beneficiaries who haven't used their entitlements in the last six months, thereafter, the State Government shall conduct e-KYC by conducting field verification within the next three months to re-evaluate the ration card, determine eligibility, and take appropriate action.

(23) The State Government shall temporarily disable beneficiaries who have been identified as duplicates within or outside the State and such disabled ration cards will be given a window of three months to revalidate or prove their eligibility by providing necessary documents and e-KYC.

(24) The State Government shall use the First-In First-Out method for issuance of ration card and display a transparent waiting list in the public domain, including on the state web-portal, allowing users to track their application status in real-time :

Provided that the State Government may prioritise eligible vulnerable and needy sections of the society in special circumstances with recorded justification.".

[F. No. 2-1/2023-PD-II]

RAVI SHANAKAR,
Joint Secretary.

*Note :* The Principal order was published in the Gazette of India, Extraordinary, Part II, Section 3, Sub-section (*i*), *vide* number G.S.R. 213 (E), dated the 20th March, 2015 and was last amended *vide* number G.S.R. 43 (E), dated the 15th January, 2024.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अशोक आत्राम,**
सह सचिव,
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.